Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-1 | January - 2025

Original Article

# चंद्रपूर जिल्ह्यातील धम्मक्रांतीनंतरचे धम्मदिक्षा सोहळयाचे आंबेडकरी चळवळीतील योगदान

**प्रा. विजय देविदास वाकोडे[1], डॉ. जयवंत निवृत्ती कांबळे[2]**
[1]संशोधक, श्री ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव, जि. चंद्रपूर
[2]मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुखकेंद्र क्र. ७०७, मातोश्री सुभद्राबाई पाटील कला विज्ञान व कै. पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मनोरा, जि. वाशिम

**Manuscript ID:**
JRD -2025-170147
ISSN: 2230-9578
Volume 17
Issue 1|
Pp. 264-265
January 2025
**Submitted:** 08 Dec. 2024
**Revised:** 20 Dec. 2024
**Accepted:** 25 Jan. 2025
**Published:** 31 Jan. 2025

***सारांश :***

*बौद्ध धम्माचा स्विकार केल्यानंतर दलितांची मुक्ती होईल असे डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत नव्हते. परंतु दलितांच्या अनेक समस्यांच्या व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी धर्मांतर हेच महत्वाचे पाऊल वाटत होते. धर्मांतरामुळे दलीतांवर असलेला अस्पृश्यतेचा कलंक दूर होऊन त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो महत्वाचा उद्देश होता. चंद्रपूर जिल्ह्यातील १६ ऑक्टोबर १९५६ च्या धम्मदिक्षेमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळ गतिमान झाली. भूमिहीन सत्याग्रह, दलित पँथर आंदोलन, रिडल्स आंदोलन, नामांतर आंदोलन , लॉंग मार्च इत्यादी सर्व आंदोलने चंद्रपूर जिल्ह्यात यशस्वी झाले. धम्मक्रांतीनंतर बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली धर्मांतर धम्मदीक्षा सोहळे अत्यंत प्रभावीपणे राबविले गेले.*

***बिजशब्द:-** धर्मांतर, रिडल्स आंदोलन, लॉंग मार्च, बॅ. राजाभाऊ खोब्रागडे इ.*

**उद्दिष्ट्ये :-**

१) आंबेडकरोत्तर धम्मक्रांतीचा ऐतिहासिक दृष्टीकोनातून अभ्यास करणे.
२) चंद्रपूर जिल्ह्यातील विविध धम्मदिक्षा सोहळयांना मिळालेला प्रतिसाद यावर चर्चा करणे.
३) चंद्रपूर जिल्ह्यातील धम्मदिक्षित सोहळयांचा परिणाम, यश-अपयश अधोरेखित करणे.

**गृहीतके :-**

१) चंद्रपूर जिल्हा धम्मदिक्षेबाबत अग्रस्थानी होता.
२) विविध धम्मचक्र प्रवर्तन सोहळयामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिवर्तन खूप गतीने झाले.
३) चंद्रपूर जिल्ह्यातील धम्मक्रांतीचा प्रभाव बौद्धेत्तर लोकांवर दिसून येतो.
४) समता सैनिक दल, रिपब्लिकन पक्ष, शेड्युल कास्ट फेडरेशन सक्रीय सहभाग होता.

**संशोधनाचे महत्व :-**धम्मक्रांतीनंतर चंद्रपूर जिल्ह्यात विविध ठिकाणी धम्मसोहळे आयोजित केले गेले. चंद्रपूर जिल्ह्यातील हे धम्मसोहळे नागरिकांसाठी उर्जा देणारे ठरले. बौद्ध धर्म प्रचार व प्रसारास गती देण्याचे कार्य केले. लोकात संघटन शक्ती वाढली. वरील विषयाच्या अनुषंगाने सांगोपांग चर्चा केली आहे.

**संशोधन पद्धती :-**

चंद्रपूर जिल्ह्यातील धम्मक्रांतीनंतर धम्मदिक्षा सोहळयाचे आंबेडकरी चळवळीतील योगदान या विषयावर संशोधन करतांना प्राथमिक व मूळ तसेच दुय्यम साधनाचा उपयोग केला आहे. उपलब्ध साधनांच्या आधारे अनुमान पद्धतीने निष्कर्ष काढण्यात आलेला आहे.

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International, The Creative Commons Attribution license allows re-distribution and re-use of a licensed work on the condition that the creator is appropriately credited*

**Address for correspondence:**
*प्रा. विजय देविदास वाकोडे, संशोधक, श्री ज्ञानेश महाविद्यालय नवरगाव, जि. चंद्रपूर*

**How to cite this article:**
*वाकोडे, . विजय . देविदास ., & कांबळे, . जयवंत . निवृत्ती . (2025). चंद्रपूर जिल्ह्यातील धम्मक्रांतीनंतरचे धम्मदिक्षा सोहळयाचे आंबेडकरी चळवळीतील योगदान. Journal of Research & Development, 17(1), 264–265.* https://doi.org/10.5281/zenodo.14965232

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI:10.5281/zenodo.14965232
Access this article online

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-17, Issue-1 | January - 2025

**विषयप्रवेश :-**

चंद्रपूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी बौद्ध धम्मदिक्षेचे सोहळे प्रभावीपणे राबविले गेले. हे समारंभ बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या सक्रीय नेतृत्वाखाली अत्यंत प्रभावीपणे राबविले गेले. शेड्युल्ड कास्ट फेडरेशन, रिपब्लिकन पक्ष, समता सैनिक दलांच्या कार्यकर्त्यांनी अत्यंत महत्वाची भूमिका बजावली.

**१) बोरगाव, ता. गोंडपिपरी येथील भव्य धम्मदिक्षा सोहळा :-**

बोरगाव हे चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यातील गाव आहे. हे आंबेडकरी चळवळीचे गाव म्हणून आजमितीला प्रसिध्द आहे. कारण या ठिकाणी १८ मे १९५७ ला बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली जवळपास ५००० लोकांनी धम्मदिक्षा घेतली. बेंबाळ, नांदगाव, गडीसुर्ला, सावली, गोवर्धन येथून लोक या धम्मदिक्षा सोहळ्यात सहभागी होती. या समारंभासाठी संत गुरुजी, सत्यविजय वाळके उपस्थित होते. या समारंभात महिलांचा सहभाग प्रचंड होता.

**२) आरमोरी येथिल धम्मदिक्षा समारंभ :-**

वर्तमानकाळातील गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी येथे २६ मे १९५८ ला बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या पुढाकारातून धम्मदिक्षा सोहळा पार पडला. ॲड. सखाराम मेश्राम यांनी या धम्मादिक्षेची तयारी केली होती. गडचिरोलीच्या आजूबाजूच्या परिसरातून जवळपास सात हजार लोकांनी धम्मदिक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व गौतम बुद्धांनी दिलेल्या ज्ञानावर व तत्वज्ञानावर आधारित यापुढे जीवन जगणार अशी सर्वांनी प्रतिज्ञा घेतली.

**३) वाघोली, जि. चंद्रपूर येथील धम्मदिक्षा :-**

शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या वतीने वाघोली येथे धम्मदिक्षा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या हस्ते अनेक स्त्री-पुरुषांना बौद्ध धम्माची दिक्षा दिली.

**४) बेंबाळ येथील धम्मदिक्षा :-**

चंद्रपूर जिल्ह्यातील बेंबाळ हे गाव नेहमी आंबेडकरी चळवळीत अग्रेसर राहिलेले होते. या सोहळ्याचे वैशिष्ट्ये म्हणजे हा सोहळा चर्मकार समाजाने आयोजित केला होता. या धम्मादिक्षेत दहा हजार लोकांनी बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या हस्ते बौद्ध धम्माची दिक्षा घेतली. धम्मक्रांतीनंतर चंद्रपूर जिल्ह्यातील चर्मकार समाज आंबेडकरोत्तर चळवळीत सोबत होता.

**५) बोकडीडोह (पळसगाव) येथील धम्मदिक्षा समारंभ :-**

१५.०४.१९५९ ला पळसगाव येथे धम्मदिक्षा समारंभ आयोजित केला. नामदेवराव नागदेवते यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला. या सोहळ्याकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, तनपुरे महाराज उपस्थित होते. तसेच भैय्यासाहेब आंबेडकरांनी मार्गदर्शन केले. त्यांनी २२ प्रतीज्ञांची उजळणी केली.

**६) तळोधी बाळापुर येथील धम्मादिक्षा :-**

नामदेवराव नागदेवते यांनी भैय्यासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली तळोधी बाळापुर येथे २२.०५.१९५९ ला धम्मादिक्षा सोहळा आयोजित करण्यात आल. या कार्यक्रमाला कवाडे गुरुजी, ॲड. सखाराम मेश्राम उपस्थित होते. या धम्मदिक्षेमुळे तळोधी बाळापुर व त्या परिसरातील गावामधील पाणी पिण्याच्या विहिरी दलितांना मुक्त करून देण्यात आल्या. काहींनी स्वताच्या विहिरी निर्माण केल्या.

**७) गडचांदूर येथील धम्मदिक्षा :-**

२८ मे १९८३ ला गडचांदूर येथे धम्मदिक्षा सोहळा संपन्न झाला. या सोहळ्याचे उद्घघाटक भन्ते सुरई ससाई हे होते. या संमेलनात सुप्रसिद्ध साहित्यिका ज्योती लांजेवार, इंदुताई खोब्रागडे तसेच टी. टी. जुल्मे, प्रेमचंद बोरकर उपस्थित होते.

**परीक्षण :-**

चंद्रपूर जिल्ह्यातील धम्मदिक्षा सोहळ्यामुळे नव धम्मबांधवामध्ये वैचारिक व सामाजिक जाणिवा विकसित झाल्या. हे सर्व धम्मदिक्षा सोहळे बौद्ध नागरिकास तसेच इतर समाजासाठी उर्जा देणारे ठरले. लोकात संघटन शक्ती वाढली. आजही चंद्रपूर येथील दिक्षाभूमीवर अफाट जनसागर उपस्थित असते. त्यातूनच आंबेडकर शक्तींचा बोलबाला स्पष्टपणे दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) शेंडे ना. रा. - ग. आ. गवई व्यक्ती आणि कार्य, प्रकाशक प्रभाकर भटकर, अमरावती, १९६३

२) हूड राजेश्वर - निसर्गभिषित चंद्रपूर, चांदा छापखाना, चंद्रपूर, १९६८

३) वासाडे प्र. भा. लोकनेते कन्नमवार, हरिवंश प्रकाशन, नागपूर १९६८

४) नागदेवते धर्मराव (संपा.) शौर्यगाथा भीमसैनिकांची, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे विचारमंच, सिंदेवाही, २०१२

५) कांबळे राजेंद्र - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचे परिणाम, सुधीर प्रकाशन, वर्धा, २००७

६) खोब्रागडे प्रेमकुमार - आंबेडकरवादी चळवळीतील समता सैनिक दलांचे योगदान, बहुजन साहित्य प्रसार केंद्र, नागपूर २०११